महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : तिसरे अंक : २४ वे दिनांक : १२/०१/२०२६ वार : सोमवार

## तुमच्या डोक्यावर कोणी नाही म्हणून बेलगाम : राज ठाकरेंच्या आरोपांवर प्रकाश महाजनांचा घणाघात



**मुंबई** : विमानतळ बंद करण्यात येऊन ती जागा हडपण्याचा डाव असल्याची शंका मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी एका वृत्तवाहिनीशी बोलताना उपस्थित केली होती. राज ठाकरेंनी केलेल्या या आरोपावर आता शिवसेना शिंदे गटाचे प्रवक्ते प्रकाश महाजन यांनी पलटवार केला आहे. मुंबईतील सांताक्रुज विमानतळ बंद झाले, ते काय विकले का सरकारने? असा सवाल महाजन यांनी राज ठाकरेंना उद्देशून विचारला आहे.

प्रकाश महाजन म्हणाले, राज ठाकरे यांच्याविषयी पूर्ण आदर ठेवून सांगतो, तुमच्या डोक्यावर कोणी नाही म्हणून तुम्ही असे बेलगाम झाले आहात. मग तुम्ही कशाला अमित शहा, सोनिया गांधी यांना भेटायला गेले होते. मुख्यमंत्री या पदाचा मान ठेवा, प्रत्येक पक्ष चालवण्यासाठी एक पद्धत असते, असा पलटवार महाजन यांनी केला आहे.

पुढे बोलताना प्रकाश महाजन म्हणाले, मुंबईतील सांताक्रुज एअरपोर्ट बंद झाले, ते काय विकले का सरकारने? कदाचित यांचे व्यवसाय बिल्डर असल्यामुळे त्यांचा डोळा त्या जागेवर असेल. सुगीत संधी की संधीत सुगी ते शोधत आहेत, हे माहीत नाही, असा टोलाही त्यांनी लगावला आहे. बाळासाहेबच ब्रँड होते, त्यांच्या पुढची पिढी बोलताना ब्लँक होते, भविष्यात एक बोलेल उद्धव ठाकरे मुख्यमंत्री होतील आणि दूसरा बोलेल राज ठाकरे मुख्यमंत्री होतील, काही सांगता येत नाही.

उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर टीका केली होती. यावर देखील प्रकाश महाजन यांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले, हे राजकीय विधान आहे, असा माझा अनुभव आहे. कोणत्याही ठाकरेला त्यांची चूक दाखवलेली अजिबात आवडत नाही. त्यांना सल्ला दिलेला देखील आवडत नाही. उद्धव ठाकरेंचे हे राजकीय विधान आहे. स्वतःची प्रतिमा सुधारण्यासाठी हे एक चावट विधान आहे.

दोन्ही भावांमध्ये वितुष्ट आणणारा संजय राऊतच

प्रकाश महाजन यांनी शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावर देखील टीका केली आहे. ते म्हणाले, जे उद्धवला बोलता येत नाही ते याच्या तोंडात टाकून दिले जाते. आता दोन्ही भावाचा संजय राऊत प्रवक्ता झाला आहे. शिवसेनेच्या वचनाला २०१९ मध्ये तडा याचमुळे गेला. दोन्ही भावांमध्ये वितुष्ट आणणारा हाच आहे. आता दोन्ही भावांना बोहल्यावर उभा करणारा हाच भटजी आहे. याच्या मनात सुप्त राग आहे. याच्या भावाला आणि याला कधीच केंद्रात आणि राज्यात मंत्री केले नाही, त्याचा राग याच्या मनात आहे आणि तो राग अशा पद्धतीने सगळ्यांचे कसे वाटोळे होईल हे पाहून संजय राऊत करतो आहे, अशी खरमरीत टीका महाजन यांनी केली आहे.

## 'लाडकी बहीण' योजनेचा हप्ता लांबणीवर पडणार?




**पुणे** : मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात संघर्षाचा केंद्रबिंदू ठरली आहे. आगामी महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, मकर संक्रांतीपूर्वी डिसेंबर आणि जानेवारीचे एकत्रित 3000 रुपये बहिणींच्या खात्यात जमा करण्याच्या हालचाली सत्ताधाऱ्यांनी सुरू केल्या होत्या. मात्र, काँग्रेसने यावर आक्षेप घेत निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, 14 जानेवारीनंतरच हे पैसे देण्यात यावेत अशी मागणी केली आहे. यावर प्रतिक्रिया देताना उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सामंजस्याची भूमिका घेतली आहे. "जर निवडणूक आयोगाने सांगितले, तर आम्ही लाडकी बहीण योजनेचा हप्ता 16 जानेवारीला देऊ," असे स्पष्टीकरण त्यांनी पत्रकारांशी बोलताना दिले.

लोकसभा निवडणुकीनंतर महायुतीला विधानसभा निवडणुकीत सत्तेत येण्यासाठी गेमचेंजर ठरलेली ही योजना आता महापालिका निवडणुकीच्या प्रचाराचे मुख्य हत्यार बनली आहे. भाजप नेते गिरीश महाजन आणि मुंबईतील उमेदवार तेजस्वी घोसाळकर यांनी दोन महिन्यांचे हप्ते एकत्र देण्याबाबत समाजमाध्यमांवर पोस्ट शेअर केल्या होत्या. याला काँग्रेसने 'निवडणूक आचारसंहितेचा भंग' असल्याचे मानत विरोध दर्शवला आहे. यासंदर्भात काँग्रेसने निवडणूक आयोगाला पत्र लिहिले असून, आपण योजनेच्या विरोधात नसून, केवळ निवडणुका संपेपर्यंत हप्ता न देण्याची विनंती केली आहे. या राजकीय पेचप्रसंगामुळे आता लाडक्या बहिणींच्या हप्त्याबाबत निवडणूक आयोग काय निर्णय घेते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी अजित पवारांचा उल्लेख 'रॉकी भाई' असा केला होता. यावर अजित पवार यांनी आपल्या खास शैलीत मिश्किल उत्तर दिले आहे. "मी अद्याप केजीएफ सिनेमा पाहिलेला नाही. आधी मी तो चित्रपट पाहतो आणि मगच ठरवतो की रोहितने मला 'रॉकी भाई' म्हटले ते योग्य आहे की अयोग्य," असे दादांनी हसत हसत सांगितले.

महायुतीमधील अंतर्गत वादावर बोलताना अजित पवार यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाही प्रत्युत्तर दिले. "मी इथे महापालिकेची निवडणूक लढवत आहे, मग मी प्रशासनातील चुका दाखवल्या म्हणजे युती धर्म पाळला नाही असे होते का?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या 'आता कुठे कंठ फुटला' या विधानाचा समाचार घेताना अजित पवार म्हणाले की, जर गेल्या नऊ वर्षांपासून निवडणुकाच झाल्या नसतील, तर जनतेच्या समस्या मांडण्यासाठी कंठ फुटणारच ना? महापालिका निवडणुकांच्या तोंडावर महायुतीतील नेत्यांमधील हे शाब्दिक युद्ध आता विकोपाला पोहोचल्याचे दिसत आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नावर अजित पवार म्हणाले, "महेश लांडगे हा खूप मोठा नेता आहे, तो स्वयंपूर्ण आहे आणि त्याचा बोलवता धनी कोणी नाही," तसेच "भोसरीतील लोक हे स्वयंभू आणि स्वाभिमानी असतात," असे म्हणत त्यांनी लांडगे यांना टोला लगावला.

## शिवसेना ठाकरे गटाच्या निष्ठावंताचा पक्षाला रामराम : दगडू सकपाळ शिंदे गटात



**मुंबई** : शिवसेना ठाकरे गटाचे माजी आमदार दगडू सकपाळ यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. म्हातारा झाल्यावर माणसाची गरज संपते, असे निराशाजनक विधान सकपाळ यांनी काही दिवसांपूर्वी केले होते. त्यानंतर त्यांनी आज एकनाथ शिंदेंच्या उपस्थितीत शिंदे गटात प्रवेश केला आहे.

मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीसाठी दगडू सकपाळ यांनी त्यांच्या मुलीला, रेश्मा सकपाळ यांना उमेदवारी मिळावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाकडे केली होती. मात्र, त्यांच्या पदरी निराशा पडली. त्यानंतर सकपाळ नाराज झाले होते. लालबाग, परळ तसेच शिवडी परिसरात त्यांनी शिवसेनेचे मोठे वर्चस्व निर्माण केले होते. परंतु, पदरी निराशा पडल्याने त्यांनी अखेर शिवसेना ठाकरे गटाला रामराम ठोकला आणि शिंदे गटात प्रवेश केला आहे.

आपले संपूर्ण कुटुंब शिवसेनेत (ठाकरे गट) कार्यरत आहे. अनेक आंदोलनांमध्ये सक्रिय सहभागी झाल्यानंतर आपल्यावर गुन्हे दाखल झाले. पक्षासाठी झोकून काम केले. गेल्या १५ वर्षांमध्ये पक्षाकडे आपण काहीच मागितले नाही. आपल्या हयातीत मुलगी नगरसेविका व्हावी अशी इच्छा होती. त्यामुळे मुलीला उमेदवारी मिळावी, अशी इच्छा व्यक्त केली होती. परंतु पदरी निराशा आली. शिवसेनेनेच मला मोठे केले. पण इतकी वर्षे सक्रिय सहभागानंतर पक्षाने आपल्याला दणका दिला, अशी खंत दगडू सकपाळ यांनी बोलून दाखवली.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६

# कालिकादेवी विद्यालयाचे चित्रकला ग्रेड परीक्षेत नेत्रदीपक यश

**शिरूर कासार :** महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालय, मुंबई. यांच्या मार्फत 'इलेमेंटरी व इंटरमिजीएट' या शासकीय चित्रकला ग्रेड परीक्षा सप्टेंबर २०२५ मध्ये घेण्यात आल्या होत्या.या दोन्ही परीक्षेचा निकाल घोषीत झाला असून या चित्रकला परीक्षेत कालिकादेवी विद्यालयाने नेत्रदीपक यश संपादन केले आहे. विद्यालयातील 'इलेमेंटरी परीक्षेला एकूण ४५ विद्यार्थी प्रविष्ट होते.ते सर्वच्या सर्व ४५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विशेष म्हणजे एकूण १४ विद्यार्थी हे 'B' ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तर उर्वरीत ३१ विद्यार्थी हे 'C' ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.तसेच "इंटरमिजीएट परीक्षेत" एकूण २३ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते.ते पण सर्वच्या सर्व २३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.यामध्ये चि.शोएब शौकत आतार हा विद्यार्थी 'A' ग्रेड प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाला आहे.तर चि.समाधान आत्माराम गुंजकर हा विद्यार्थी 'B' ग्रेड श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाला आहे.आणि उर्वरित २१ विद्यार्थी हे 'C' ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य केशव भांगे साहेब व कला शिक्षक श्री राजू बडे सर यांच्या योग्य मार्गदर्शनामुळेच शासनाने घेतलेल्या 'इलेमेंटरी व इंटरमिजीएट' या दोन्ही चित्रकला परीक्षेत विद्यालयाचा एकूण १००% निकाल लागला असून विद्यालयाने याही वर्षी निकालाची परंपरा कायम ठेवून नेत्रदीपक यश संपादन केले आहे.विद्यालयाच्या या यशामुळे आदर्श संस्थेचे सचिव तथा माजी मंत्री मा. जयदत्त (अण्णा) क्षीरसागर साहेब,मा.रोहित(भैया) क्षीरसागर,प्रशासकीय अधिकारी डॉ. राजू मचाले साहेब, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी श्री योगेश पवार साहेब, मा.एम.ए.राऊत सर, प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याध्यापक प्रकाश राठोड, पर्यवेक्षक जनार्दन काळे. तसेच विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी या सर्वांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

# श्री साई चरित्र पारायण सोहळयास प्रारंभ



**फुलंब्री :** तालुक्यातील खामगाव गोरक्षनाथाचे येथे ६ जानेवारी मंगळवार पासून श्री साई चरित्र पारायण सोहळा सुरुवात झाली.साई पारायण (श्री साई सच्चरित) म्हणजे साईबाबांच्या लीला आणि शिकवणुकीचे पठण करणे, ज्याचे महत्त्व श्रद्धा, सबुरी, आत्मज्ञान आणि सर्व इच्छापूर्ती यासाठी आहे.हे पारायण ज्ञान, धन, आरोग्य आणि समाधान मिळवून देते, तसेच भवसागर पार करण्यास मदत करते, कारण हा ग्रंथ भक्तांसाठी एक सोपा आणि प्रभावी साधना मार्ग आहे. हे पारायण सोहळाचे ३ रे वर्ष आहे. सकाळी ७ वा पारायण सुरुवात होते,व्यासपीठ चालक छबुताई सोनवणे, संतोष चव्हाण यांच्या सह साईभक्त पारायण केले जाते. दि.१२ जानेवारी सोमवार रोजी साई ग्रंथाची मिरवणूक दुपारी ३ वाजता निघणार आहे. दि.१३ जानेवारी मंगळवारी भागवताचार्य कृष्णा महाराज शास्त्री दरेगांवकर सकाळी ११ काल्याचे किर्तन होणार आहे, त्या नंतर महाप्रसाद आयोजन करण्यात आले आहे.यावेळी सर्व साईभक्तनी उपस्थित रहावे असे आवाहन साईभक्त परिवार , समस्त ग्रामस्थ वतीने करण्यात आले.

# जिजाऊ आणि सावित्रीबाईच्या स्वप्नातील सक्षम महिला बना - प्राचार्य डॉ. संजय अस्वले




**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** मुलींनो तुम्ही सुरक्षित आहात, तुमचे शरीर हे तुमची ताकद आहे, ती तुमच्या निरोगी शरीराची नैसर्गिक ओळख आहे, तुम्ही स्वच्छता ठेवता, स्वतःची काळजी घेता, तेव्हा तुम्ही केवळ स्वतःला नाही तर तुमच्या स्वप्नांना संरक्षण देत असता.कधीही वेदना, त्रास, भीती किंवा प्रश्न असतील, तर ते मनात ठेवू नका. आई, शिक्षक, डॉक्टर किंवा विश्वासू व्यक्तींशी मोकळेपणाने बोला. मुलींनो, तुमचे शिक्षण, आरोग्य आणि स्वाभिमान हेच तुमचे खरे दागिने आहेत. कोणत्याही अंधश्रद्धा, टोमणे किंवा भीतीला तुमच्या आत्मविश्वासावर राज्य करू देऊ नका. स्वतःची काळजी घ्याआणि जिजाऊ व सावित्री बाई फुले यांच्या स्वप्नातील सक्षम महिला बना असे आवाहन श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ संजय अस्वले यानी विद्यार्थिनींना केले.उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात महिला सबलीकरण कक्ष आणि आरएसपीएल कानपूर यांच्या वतीने १००० मुलींना सॅनिटरी नॅपकिन पेड वाटप आणि मुलींना समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थिनींना समुपदेशन कार्यक्रमात डॉ अस्वले बोलत होते. यावेळी कंपनीचे प्रतिनिधी प्रभाकर चोबे, शहरातील विक्रम माणिकवार यांच्या समूहांचे प्रतिनिधी, तसेच उपप्राचार्य प्रा जी एस मोरे, पर्यवेक्षक प्रा. शैलेश महामुनी, महिला सबलीकरण कक्षाच्या प्राध्यापक प्रा. आर आर नितनवरे, डॉ. एम एस निर्मळे, डॉ. ए एस शिंदे डॉ. पी. एल सावंत, प्रा. बीना लोकरे, प्रा.वसुधा निचत, प्रा. जोडदापके व महिला सदस्य आणि १००० विद्यार्थिनीची उपस्थिती होती.

# "अंगत पंगत" ला अक्षर साधना बालसाहित्य पुरस्कार






**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** पालघर जिल्हयातील वाडा येथील साहित्य कला विचार मंच आयोजित राज्यस्तरीय साहित्य संमेलनात मराठवाड्याचे प्रसिध्द बालकवी अय्युब पठाण लोहगावकर यांच्या आशयघन व दर्जेदार बालकविता संग्रह " अंगत पंगत." ला राज्यस्तरीय अक्षर साधना बालसाहित्य पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आले आहे. या पुरस्काराचे स्वरूप आकर्षक स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम असे आहे. "अंगत पंगत" ला हा सलग राज्यस्तरीय पाचवा पुरस्कार मिळालेला आहे. अक्षर साधना बाल साहित्य पुरस्कार मिळाल्याने अय्युब पठाण लोहगावकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६


## महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे ! : प्रा. सौ. ज्योती रकटे



**पाटोदा (प्रतिनिधी) :** महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे ! असे प्रतिपादन ग्रंथपाल प्रा.सौ.ज्योती रकटे यांनी केले.त्या मौजे बांगरवाडी ता.पाटोदा येथे जयभवानी महाविद्यालयाच्या रासेयो च्या युवक विशेष शिबीरात प्रमुख वक्त्या म्हणुन बोलत होत्या.पुढे बोलतांना म्हणाल्या की महिला कोणत्याच क्षेत्रात सुरक्षित नाहीत,कुटूंब, शासकीय कार्यालय, सार्वजनणीक ठिकाणे आदि ठिकाणी महिला सुरक्षित नाहीत.त्यासाठी कठोर कायदे ही करण्यात आले आहेत परंतु त्याची योग्य अमलबजावणी होत नाही.व त्यासंबधी जनजागृती होताना दिसत नाही.तेव्हा महिलांची सुरक्षा ही समाजाची सामुहिक जबाबदारी आहे.ती समाजाने घ्यावी असे शेवटी त्यांनी अहवान केले.व भयभीत मनस्थितीमुळे महिलांचे आरोग्य धोक्यात येते.म्हणुन महिलांनी ही आत्मसुरक्षा करुन आपले मनोधैर्य व मनोबल वाढवणे गरजेचे आहे.तसेच स्वसंरक्षण करणे आवश्यक आहे.अशी अपेक्षा व्यक्त केली.या बोध्दिक सत्राच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ.वंदन जाधव हे होते.तर व्यासपीठावर अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक प्रा.विनोद किर्दक,कनिष्ठ विभागाचे प्रमुख प्रा.प्रकाश नाईकवाडे,प्रा. सतिश जरांगे,प्रा.केशव सुर्वे ,श्री.दिपक जावळे, मुख्याध्यापक श्री.राख आदिची उपस्थिती होती.या नंतर ग्रंथालय विभागाच्या वत्तीने "ग्रंथालय आपल्या दारी "उपक्रम राबविण्यात आला.भव्य ग्रंथ प्रदर्शन भरविण्यात आले.यात विद्यार्थी व ग्रामिण भागातील नागरीकांनी या ग्रंथप्रदर्शनात अनेक पुस्तकांची पाहणी केली.नवनविन पुस्तकांची माहिती मिळाली.या सत्राचे संचलन प्रा. डॉ.बंडू लोखंडे यांनी केले.तर आभार प्रा.डॉ.फुन्ने सर यांनी केले.या प्रसंगी बहुसंख्य शिबीरार्थी व नागरीकांची उपस्थिती होती.हे शिबीर यशस्वी करण्यासाठी मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम व प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाधिकारी प्रा.बंडू लोखंडे, नाटककार प्रा.बापू धोक्षे, प्रा. पापाजी चव्हाण आदि स्वंयसेवक अथक परिश्रम घेत आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराच्या बौध्दिक सत्रात विविध मान्यवरांचे मौलिक मार्गदर्शन




**जालना :** जीवनात यशस्वी होण्यासाठी प्रत्येकालाच संधी असते, मात्र त्यासाठी नेमके प्रयत्न आणि नियोजन आवश्यक आहे. पूर्वतयारीशिवाय कोणतीही गोष्ट यशस्वी होऊ शकत नाही. असे मत सेवानिवृत्त पोलीस अधिकारी प्रभाकरराव वाघ यांनी व्यक्त केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयाच्या गोंदेगाव जिल्हा. जालना येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय श्रम संस्कार शिबिरात विद्यार्थ्यांशी ९ जानेवारी २०२६ रोजी दुपारच्या बौद्धिक सत्रात ते संवाद साधत होते. पुढे ते म्हणाले की, व्यक्तीचे बोलणे आणि वर्तन यावरून त्याची क्षमता कळते. आपल्या कल्पनांना प्रत्यक्षात आणता आले पाहिजे. स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी योग्य वातावरण असणे गरजेचे आहे. बुद्धीचा विकास हळूहळू होत असतो, त्यामुळे सातत्य महत्त्वाचे आहे. यावेळी प्रा. डॉ.कालिदास सूर्यवंशी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी यशासाठी धडपड केली पाहिजे गरीबी, लाचारी या सगळ्यांना बाजुला सारून यश गाठता आलं पाहिजे. यावेळी सूत्रसंचालन करून आभार अनिरुद्ध निकम यानी मानले.१० जाने. रोजीच्या दुपारच्या बौद्धिक सत्रात प्रा. प्रमोद जायभाये यांनी सुसंवाद साधला ते म्हणाले, सध्याच्या युगात यशस्वी होण्यासाठी केवळ शैक्षणिक ज्ञानासोबतच उत्तम चारित्र्य असणे आवश्यक आहे. तुमची वागणूक कशी आहे, तुम्ही कोणते गुण आत्मसात करता, यावर तुमचे व्यक्तिमत्व ठरते. कोणत्याही क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आत्मविश्वास असणे अत्यंत गरजेचे आहे. प्रभावी संवाद साधण्याची कला तुम्हाला इतरांशी जोडून ठेवण्यास मदत करते. आयुष्याकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन यशाच्या जवळ घेऊन जातो. वेळेचा योग्य वापर आणि प्रामाणिकपणा, शिस्त या मूल्यांचे पालन करणे आवश्यक आहे. या गुणांचा अंगीकार केल्यास व्यक्तिमत्व अधिक संपन्न आणि प्रभावी होऊ शकते. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे जालना जिल्हा समन्वयक डॉ. विठ्ठल गाडेकर व डॉ. भरत धोत्रे, प्रा. सुरेश कांगणे यांची उपस्थिती होती. डॉ. विठ्ठल गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना बोलताना शाश्वत विकास म्हणजे चिरकाल आनंद देणाऱ्या गोष्टी आपल्याला जपायच्या आहे. निसर्गाचा सन्मान आणि संगोपन करायचे आहे. सामाजिक बार्बीसोबत संवेदनशील व्हायचे आहे व वास्तवतेशी एकरूप व्हायचे आहे. डॉ.भरत धोत्रे यांनीही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिबिरासाठी शुभेच्छा दिल्या. समारोपामध्ये डॉ. सुरेश कांगणे यांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' अशा अध्यात्मिक विचारांमध्ये विद्यार्थ्यांना निसर्गाचे संगोपन करण्यास प्रेरित केले. यावेळी कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. उद्धव थोरवे, प्रा.अभिजीत भुतेकर, प्रा. क्षमा अनभुले, प्रा. बाबासाहेब वाघ यांच्यासह स्वयंसेवक व गावकरी उपस्थित होते.

## रामराज्य वृक्ष कोविदार चे पूर्णेश्वर देवस्थान मंदिरात रोपण



**कन्नड (अरुण थोरात) :** राम राज्यातील राज वृक्ष असलेल्या कोविदार वृक्षाचे सिल्लोड येथील पूर्णेश्वर मंदिरात संघाच्या वतीने गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या हस्ते विधिवत रोपण करण्यात आले आहे. अयोध्या येथे श्रीराम मंदिरावर ध्वजरोपण केलेल्या ध्वजावर या झाडाचे आहे रूप चिन्ह अंकीत आहेत. नुकतेच अयोध्येतील श्रीराम मंदिरावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते श्रीराम राज्यातील "जय ध्वज" हा धर्म ध्वज आरोहीत केला. या धर्म ध्वजावर राम राज्यातील राज वृक्ष असलेला कोवीदार म्हणजेच रक्त कांचन, ओम व सूर्य ही रूप चिन्हे अंकित आहेत. कोवीदार वृक्ष व सदर ध्वज पराक्रम, समृद्धी, ऊर्जा, धर्म रक्षा याचे प्रतीक समजला जातो. कोविदार हा वृक्ष देशात वन्य अवस्थेत आढळतो. सदर वृक्षाचे अयोध्येतील ध्वजरोपनाचे निमित्ताने भारतात सर्वप्रथम तालुक्या सह जिल्ह्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गतीविधी विभागातर्फे रोपण करण्यात येत आहे. मोहन भागवत यांच्या आदेशाने ही संकल्पना राबविणारे व जंगलातून बीज संकलन करून रोपं निर्माण करणारे डॉ. संतोष पाटील यांनी सांगितले. सिल्लोड चे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांच्या हस्ते हे शहरातील पूर्णेश्वर महादेव व गणेश व्यवहारे यांच्या शेतातील महादेव मंदिर परिसरात हे रोपण करण्यात आले. यावेळी संघाचे जिल्हा व तालुका पदाधिकारी व पंच क्रोशीतील भाविक उपस्थित होते.

कोविंद वृक्षाचे पर्यावरणीय मूल्य मोठे आहे. ते फुलपाखरांना उपयुक्त आहे. "चिलादेस पांडव" या प्रजातीच्या फुलपाखराची मादी या झाडाच्या पानांवर अंडी घालून आपला जीवनक्रम पूर्ण करते.मधमाशाही या फुलावर अन्न प्राप्त करतात. उदर विकारात उपयुक्त औषधी गुणधर्म ही या देववृक्षात आहे.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६

# डॉ. पंढरीनाथ रोकडे यांना राष्ट्रीय क्रीडा विज्ञान परिषदेच्या 'जीवन गौरव पुरस्काराने' सन्मान...!!



**छत्रपती संभाजीनगर** : दि. १० जानेवारी २०२६ – क्रीडा शिक्षण, संशोधन आणि सामाजिक क्षेत्रात चार दशकांहून अधिक काळ अथक योगदान देणारे, ग्रामीण भागातील छोट्या गावातून राष्ट्रीय स्तरावर नावाजलेले प्रोफेसर डॉ. पंढरीनाथ रोकडे यांना राष्ट्रीय क्रीडा परिषदेने प्रतिष्ठेच्या 'जीवन गौरव पुरस्कार' ने सन्मानित केले आहे. या सन्मानामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील क्रीडा व शिक्षण क्षेत्रात उत्साहाचे वातावरण पसरले आहे.डॉ. पंढरीनाथ रोकडे हे कळमसरा या छोट्या ग्रामीण गावातील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मले. ध्येयवादी वृत्ती, कठोर परिश्रम आणि अटल निश्चय यांच्या बळावर त्यांनी क्रीडा क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळवले. केवळ क्रीडाच नव्हे, तर शिक्षण, संशोधन, साहित्य, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. देशसेवेचे व्रत अंगीकारून त्यांनी विचार आणि व्यवहार यांचा सुंदर समन्वय साधला असून, राष्ट्रीय विचारांच्या जोपासनेतून समाजजडणघडणीत सक्रिय सहभाग घेतला आहे.दीर्घकालीन सेवेची दखलगेल्या चार दशकांपासून डॉ. रोकडे राज्य आणि देशभरातील क्रीडा व साहित्य क्षेत्रात सातत्याने कार्यरत आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्न मोरेश्वर महाविद्यालय येथे शारीरिक शिक्षण विभागप्रमुख आणि प्रभारी प्राचार्य म्हणून त्यांनी यशस्वीपणे जबाबदाऱ्या पार पाडल्या. ३५ वर्षांच्या दीर्घ सेवेनंतर निर्धारित सेवानिवृत्ती वयानुसार ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी ते सेवानिवृत्त झाले.सेवानिवृत्तीनंतर त्यांच्या सर्मपित सेवेच्या पूर्तीनिमित्त फुलंब्री येथे आयोजित 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन स्पोर्ट्स सायन्स' या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत (दि. ९-१० जानेवारी २०२६) त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. तेलंगणा युनिव्हर्सिटीचे माजी कुलगुरू प्रो. डॉ. एल. बी. लक्ष्मीकांत राठोड, आंतरराष्ट्रीय शारीरिक शिक्षण संघटनेचे प्रमुख प्रोफेसर डॉ. राजेश कुमार, पेफी (PEFI) संघटनेचे सचिव डॉ. पियुष जैन यांच्या हस्ते हा 'जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आला.शैक्षणिक व संशोधन योगदानडॉ. रोकडे यांच्या मार्गदर्शनाखाली आतापर्यंत २१ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. तर १७ विद्यार्थ्यांनी एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे. विविध विषयांवरील त्यांची २१ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. त्यांना २० हून अधिक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले असून, १०० हून अधिक संशोधनपत्रे विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाली आहेत.खेळाच्या क्षेत्रात त्यांनी अनेक राज्यस्तरीय, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांचे आयोजन करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. महाविद्यालयीन सेवेदरम्यान राष्ट्रीय सेवा योजना (NSS) कार्यक्रम अधिकारी म्हणूनही त्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली असून, विद्यापीठातर्फे त्यांना 'उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते.या सन्मानाबद्दल बोलताना डॉ. रोकडे म्हणाले,"ग्रामीण भागातून येऊन राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळवणे हे माझ्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. हे यश केवळ माझे वैयक्तिक नाही, तर माझ्या गावातील, कुटुंबातील आणि संपूर्ण समाजातील सर्वांच्या प्रेरणेचे व सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. क्रीडा आणि शिक्षणाच्या माध्यमातून मी नेहमीच देशसेवा करण्याचा प्रयत्न केला आहे."या राष्ट्रीय परिषदेच्या कार्यक्रमाला देशभरातील अनेक नामवंत व्यक्ती उपस्थित होत्या. यामध्ये प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू प्रो. डॉ. एल. बी. लक्ष्मीकांत राठोड (तेलंगणा), प्रो. डॉ. नीरज जैन (लखनऊ युनिव्हर्सिटी, उत्तर प्रदेश), प्राचार्य डॉ. सर्जेराव ठोंबरे (माजी सचिव, पंडित दीनदयाल संस्था), प्रो. डॉ. राजेश कुमार (उस्मानिया युनिव्हर्सिटी, हैदराबाद), प्रा. डॉ. पियुष जैन (राष्ट्रीय सचिव, फिजिकल एज्युकेशन फाउंडेशन ऑफ इंडिया, नवी दिल्ली), प्रोफेसर डॉ. अरुलमोझी सरवानंद (तामिळनाडू), प्रतिभा गोरेगावकर (मराठी चित्रपट अभिनेत्री), प्रोफेसर डॉ. योगमाया पांडा (ओडिशा), प्रोफेसर डॉ. नीता बंदोपाध्याय (कल्याणी युनिव्हर्सिटी, प. बंगाल), डॉ. मोनिका घुगे (संचालक, भारतीय क्रीडा प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर) आदी उपस्थित होते.परिषदेचे आयोजक संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. टकले व क्रीडा संचालक प्रोफेसर डॉ. संदीप जगताप आदींसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयांतील अनेक प्राध्यापक व क्रीडा तज्ज्ञ उपस्थित होते.डॉ. रोकडे यांच्या या उल्लेखनीय यशाने ग्रामीण भागातील तरुणांसाठी एक आदर्श निर्माण झाला असून, क्रीडा व शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींमध्ये नवीन उत्साह संचारला आहे. राष्ट्रीय क्रीडा परिषदेने अशा समर्पित व्यक्तींचा सन्मान करून क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन दिले आहे, असे मत क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.या पुरस्कारामुळे डॉ. पंढरीनाथ रोकडे यांच्या कार्याला आणखी बळ मिळेल आणि ग्रामीण तरुणांना क्रीडा व शिक्षणाच्या माध्यमातून यशस्वी होण्याची प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त होत आहे.

# संत सावता मध्ये विद्यार्थी उर्जेवर मार्गदर्शन



**पाखरसांगवी** : उन्नती बहुउद्देशीय शिक्षण संस्था संचलित संत सावता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय पाखरसांगवी बार्शी रोड लातूर येथे विद्यार्थ्यांनी आपली अभ्यासातील एकाग्रता वाढवण्यासाठी आपली ऊर्जा वाढवली पाहिजे त्यामुळे आपले मन प्रसन्न होऊन एकाग्रता वाढण्यास मदत होऊ शकते. असे श्रीमान भारतरावजी काळे साहेब यांनी सांगितले.संत सावता विद्यालयात ते प्रमुख पाहुणे व विद्यार्थी मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. ते पुढे म्हणाले की,आहार निद्रा विश्रांती आणि योग प्राणायाम तसेच नामस्मरण यातून मानवाला ऊर्जा प्राप्त होत असते. हसणे ही निसर्गाने मानव प्राण्याला दिलेली महत्त्वपूर्ण देणगी आहे त्यामुळे वरील माध्यमाद्वारे ऊर्जा प्राप्त करून मन प्रसन्न हसतमुख राहून योग साधनेची कास धरून अंतर व बाह्यमन तसेच शरीर याचे आरोग्य निरोगी ठेवता येते. योग गुरु श्री श्री रविशंकर यांच्या विचाराने कृतीतून व साधनेतून तसेच सुदर्शन क्रियेतून विद्यार्थ्यांनी आपली मने व शरीर प्रकृती सतत ऊर्जात्मक ठेवली पाहिजे. निरोगी शरीरात निरोगी मन राहते यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांना काही प्राणायाम करावयास लावले. शाळेसाठी स्वतः दातृत्वाचा हात पुढे करून समाजातील दानशूरांना शाळेच्या आर्थिक समस्या सोडविण्यासाठी प्रवृत्त करण्याचे आश्वासनही दिले. श्री श्री रविशंकर यांची प्रतिमाही शाळेला भेट दिली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक प्रा. लक्ष्मण बादाडे यांनी विद्यार्थ्यांना प्र. के. अत्रे आणि पु. ल. देशपांडे यांची विनोदी किस्से सांगून विद्यार्थी अवस्थेमध्ये आपण जे आनंदाने शिकतो ते कधीही विसरत नाही असे सांगितले. अधिकारी बाळासाहेब फासे आणि इंजिनीयर राजेश सदाशिवराव फुटाणे यांनी शाळेला साऊंड सिस्टिम संच दिल्या बद्दल त्यांचे आभारही मानले. आरोही गोडबोले आणि वेदांत राजनाळे यांनीही विद्यार्थ्यांना विनोदाच्या माध्यमातून हसविले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका भाग्यश्री भालेराव स्वागत गीत मनीषा राठोड तर आभार महेश वाघमारे यांनी मानले कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका वाघमोडे सुप्रिया, आदुडे राजश्री, जाधव अंजली, शेख मर्जीना, सोलंकर आरती आणि शिंदे कोमल यांनी परिश्रम घेतले.






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६


# मराठी आणि महाराष्ट्र धर्म!

**हिं**दीशिवाय दुसरी कोणतीही 'बोली' मराठी भाषेची जागा घेऊ शकत नाही. म्हणूनच महाराष्ट्रात मराठीला हिंदीपासूनच जास्त धोका आहे! शब्दांचे आदान प्रदान होत भाषा प्रवाहित होतात, पण हिंदी माणसांसहीत हिंदी भाषा मराठीत एकतर्फी आदानच होत आहे, मराठीचे प्रदान कधी होणार? बाहेरची कोणतीही भाषा स्थानिक जनतेत प्रचलित असलेल्या एखाद्या भाषेला मारु शकत नाही, पण सत्तेतल्या वेगळ्या भाषिक प्रेमाच्या लोकांनी ठरवले तर ते कामकाजात जवळची भाषा बदलून (हिंदी- मराठी साम्य) स्थानिक बहुजनांची भाषा ठरवून मारू शकतात! महाराष्ट्रातील सत्ताधाऱ्यांची मातृभाषा मराठी आहे की हिंदी आहे? त्यांची मातृभाषा मराठी असेल तर या सत्तेला एवढा हिंदीज्वर येण्याचे कारण काय? मराठी सत्तेत ज्यांचे हिंदीचे प्रेम उतू जात असेल, त्यांचे मराठी राज्यात काय काम आहे? त्यांनी महाराष्ट्रातून चंबुगबाळे आवरून दिल्लीत वा उत्तर भारतात सत्ताकारण करावे. आधी मराठी भाषा, महाराष्ट्र धर्म, सार्वभौम संयुक्त महाराष्ट्र प्रांत, नंतर काय ते! मराठी माणूस जसा न शिकता ऐकून हिंदी बोलू शकतो, तसा हिंदी भाषिक माणूसही ऐकून मराठी बोलू शकतो. पण तशी त्यांची इच्छाशक्ती नाही! जो इथे राहून मराठी जन्मभूमी-कर्मभूमीला होत नाही, तो दुसऱ्या प्रदेशाला वा भारताला कसा होईल? म्हणून महाराष्ट्रातील भाजपसह सर्व राजकीय पक्षांनी मराठीसाठी एक होत मराठी व महाराष्ट्र विरोधी लोकांचा सत्तेतून कडेलोट करायला हवा!

आज मराठीची झाली तशी हिंदी प्रातांत हिंदी भाषेची केविलवाणी अवस्था झाली असती तर मी हिंदीच्या बाजूने असेच लिहिले असते! भाषा कोणतीही असो तिचा व्देष करता कामा नये आणि एखादी भाषा मारण्याचे प्रयत्न तर खूप असमंजसपणाचे ठरतात! महाराष्ट्र म्हणजे फक्त भूगोल नाही. (परप्रांतीय लोक इथल्या जमिनी विकत घेऊन इथला भूगोलही बदलणार आहेत.) महाराष्ट्राचा इतिहास, लोकजीवन, लोकसंस्कृती आणि इथल्या अनेक घटकबोलीसह मराठी भाषा वजा केली तर शिल्लक शून्य राहील! मुंबईत मराठी भाषेत बोलायचे नाही, मग काय युपी बिहारात मराठी बोलाल का? लोकहो, छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्यदिव्य कारकिर्दीपासून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची चळवळ आठवा, वाचा, अभ्यास करा. 106 लोकांनी मराठी मुंबईसाठी हौतात्म्य पत्करले ते आठवा.

एका चॅनलवर मुंबईच्या बाजारात निवडून निवडून अनेक परप्रांतीय लोकांची मुलाखत एवढ्यात पाहण्यात आली. अलीकडच्या काळात त्यांची बोलण्याची मग्रुरी, उध्दटपणा, उद्दामपणा, निलाजरेपणा लगेच लक्षात येत आहे. आम्हाला मराठी शिकायची गरज नसून यापुढेही शिकणार, बोलणार नाही असे सहज हिंदीत सांगतात. मुंबईतले वातावरण यापूर्वी इतके कधीच गढूळ झालेले नव्हते. काही परप्रांतीय लोक आतापर्यंत मराठी लोकसंस्कृतीत मिसळत नसले तरी याआधी स्थानिकांवर कुरघोडी करण्याइतके निर्ढावले नव्हते, आपण परराज्यात उपरे आहोत याची जाणीव त्यांना होती. आता मात्र ते मराठी माणसाला भाषेसह सगळ्याच क्षेत्रात आव्हान देण्याच्या तयारीत आहेत. मुंबईतल्या काही भागात मराठी लोकांना घरे विकत घेता येत नाहीत, भाड्याने मिळत नाहीत, काही आस्थापनात मराठी तरूणांना नोकऱ्या दिल्या जात नाहीत. राजरोस 'मराठी तरुण नको' अशा जाहिरातीही प्रकाशित होतात. परप्रांतीय लोक 'आम्ही भारतीय आहोत' असे सांगत मुंबईत हक्काने राहू शकतात, पण आपल्याच प्रांतात मराठी लोक- तरूण परप्रांतीयांच्या कॉलनीत राहू शकत नाहीत, त्यांच्या आस्थापनात नोकऱ्या करू शकत नाहीत! या लोकांचा असा नेमका कोणता भारत आहे? कोणत्या राज्यघटनेनुसार हे सुरू आहे? मराठी माणसाच्या विरोधात त्यांच्या संघटना बांधल्या जात आहेत. महापालिका निवडणुकीत अमराठी लोक मोठ्या प्रमाणात उमेदवार असून एका राष्ट्रीय पक्षाने 44 अमराठी उमेदवार उभे केले आहेत. मुंबई ताब्यात घेण्याच्या गोष्टी ते राजरोस करत आहेत. कोणाच्या वरदहस्ताने हे होत आहे? मराठी प्रांतीय म्हणून निवडून आलेले आपले सरकार आपल्यासोबत नसेल तर असेच होत राहील. मराठी लोकांच्या अस्मितेच्या स्वतंत्र प्रांतिक मान्यता मिळालेल्या महाराष्ट्र राज्यातल्या मराठी लोकांनी निवडून दिलेले सरकार स्थानिकांच्या बाजूने नाही?

मराठी भाषा, मराठी लोकसंस्कृती आणि स्थानिक अस्मितेच्या जतनासाठी महाराष्ट्राला सक्षम प्रादेशिक राजकीय पक्षाची गरज भासू लागली आहे का? मुंबईत महाराष्ट्र धर्म जिवंत ठेवायचा असेल तर अमराठी उमेदवाराला (तो माणूस तुम्हाला आवडणाऱ्या पक्षातला असला तरी) मतदान करू नका! महाराष्ट्रातले धार्मिक सत्ताधारी लोक मराठी माणसाला हिंदू समजत नाहीत का? मग सरकारी पातळीवरून मराठी- हिंदी भाषिक झुंज लावण्याचे कारण काय? स्वार्थासाठी खेळलेली ही खेळी महाराष्ट्राच्या मुळावर येऊ शकते! लोकसभा- विधानसभेच्या निवडणुकीत तुम्ही हिंदू असता, मग मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत मराठी भाषिक हिंदूलोक शत्रू कसे होतात? लोकहो, डाव ओळखा आणि हाणून पाडा! मराठी सत्तेतला हिंदी टक्का जसा वाढत जाईल तसा हा मराठी प्रांत नामशेष होत जाईल! आणि ज्यांना हे मराठी स्वतंत्र अस्मितेचे प्रांतिक राज्य मान्य नसेल, त्यांना महाराष्ट्राच्या सत्तेत राहण्याचा अधिकार नाही. कारण राज्याचा मूळ पायाच मराठी प्रांत असा आहे. तसे नसते तर एखाद्या हिंदी प्रदेशाला वा केंद्राला हे राज्य जोडले गेले असते.

आपली भाषा मारणारे, आपल्या भाषेतल्या शाळा बंद करणारे, मराठी शाळेच्या वास्तू उध्वस्त करणारे, पहिलीपासून त्रिभाषा सूत्राच्या नावाने हिंदी लादू पाहणारे, अमराठी लोकांना सर्व दरवाजे उघडे करुन देणारे, आपल्या लोकांना जगवणारी झाडे तोडणारे, आपणच निवडून दिलेले सरकार आपले का नाही, हा जनतेच्या मनातला प्रश्न आहे! सरकार उत्तरदेही आहे की नाही? लोकसभेला हिंदू- मुसलमान करून, विधानसभेला मराठा- ओबीसी लढवून आणि आता मुंबई महापालिकेसाठी मराठी- हिंदी भाषा वाद उकरून निवडणूक जिंकण्याचा बेत जे कोणी करत असतात, ते लोक सामाजिक बांधिलकी पाळणारे नसतात, फक्त सत्तापिपासू ठरतात. म्हणून आज मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्र, हेच सत्य! बाकी सगळे असत्य! मराठी भाषा आणि मुंबई वाचवा. मुंबईत एकही परप्रांतीय निवडून यायला नको. परप्रांतियांचे, परराज्याचे लांगुलचालन करणारे आणि केंद्रात महत्वाचे पद मिळवण्यासाठी हिंदी भाषेला कुरवाळणारेही निवडून यायला नकोत. मग ते मराठी भाषिक असोत, परभाषिक असोत की कोणत्याही पक्षाचे! आपला धर्म- महाराष्ट्र धर्म! आपली अस्मिता, भाषा, लोकसंस्कृती मराठी! मुंबईत फक्त मराठी बोला!

संपूर्ण महाराष्ट्रातील आपापल्या गावात-शहरात (आपापल्या मातृभाषा बोलीसह) मराठी भाषा बोलली जाते. आपल्या गावातले काही नागरिक आपल्या कुटुंबात हिंदी सदृश्य भाषा बोलत असले तरी ती हिंदी नसते, त्यांची पारंपरिक बोली असते, पण हे नागरिक बाहेर आपल्याशी मराठी बोलतात, कारण ते मराठीच लोक आहेत. म्हणून त्यांच्याशी आपण हिंदीत न बोलता मराठीतच बोलावे. कोणत्याही दुकानात, हॉटेलीत, व्यवहारात, प्रवासात, फोनवर मराठीतच बोलावे. दुसऱ्या राज्यात गेल्यावर, दुसऱ्या राज्यातल्या व्यक्तीशी फोनवर अथवा काही दिवसांसाठी पर राज्यातून आलेल्या पाहुण्यांशी हिंदी बोलायला हरकत नाही.

आपली मुले, नातवं, पाल्य इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जात असतील तर त्यांनी इंग्रजीत बोलायला हरकत नाही, पण आपली स्थानिक मायबोली आणि मराठीही त्यांना चांगल्या प्रकारे बोलता यायला हवी याची काळजी पालकांनी घेतली पाहिजे. इंग्रजी माध्यमांच्या शाळेत मुले मराठी भाषिक असतात, शिक्षकसुध्दा मराठी भाषिक असतात, पण संवादाची भाषा मुद्दाम हिंदी वापरली जाते. असे का? पालकांनी जागरूकपणे हे शाळेला विचारले पाहिजे. एकतर शाळेत तुम्ही इंग्रजीतच बोला, इंग्रजी व्यतिरिक्त अन्य भाषेत संवाद करायचा असेल तर तो संवाद मराठीत व्हायला हवा, हिंदीत नाही. इंग्रजी बोलता येत नाही म्हणून आपल्याच भाषेचा व्देष करत हिंदी का बोलता? तुम्ही पाल्यांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घातले आहे, हिंदी माध्यमाच्या नव्हे, हे लक्षात ठेवा.

मुंबई- ठाणेकरांनो आताच जागे व्हा, तुम्ही स्वत: अडचणीत सापडाल अथवा हा वणवा तुमच्या घरापर्यंत पोचेल तेव्हा तुम्हाला भविष्यात कधीतरी जाग येईल, पण तेव्हा वेळ निघून गेलेली असेल. म्हणून मग्रूर परप्रांतियांना आणि त्यांना पायघड्या अंथरणाऱ्यांनाही पाडा. हिंदूचे राज्य म्हणून नव्हे, मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे महाराष्ट्र राज्य 1 मे 1960 ला अस्तित्वात आले आहे, याचे (संविधानानुसार) भान ठेवा. महाराष्ट्र धर्म वाचवा.

(अप्रकाशित लेख. मुंबई-ठाण्यातील लोकांना पाठवा. इतरत्र वापर करताना लेखकाच्या नावासह ब्लॉगचा संदर्भ द्यावा ही विनंती.)


**डॉ. सुधीर राजाराम देवरे**

ब्लॉगचा पत्ता :

http://sudhirdeore२९.blogspot.com/



इरफान इनामदार

मो. 8956362639
8087880274
9405109103

E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल

कॉम्प्युटर्स अ‍ॅण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईन्डींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद.



प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६


## अज्ञान व असुरक्षितता हेच बालविवाहाचे प्रमुख कारण. - प्रा. डॉ. असिया चिश्ती

**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे)** : तालुक्यातील गुंजोटी येथील श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या वतीने आयोजित केलेल्या मौजे कदेर येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय शिबिरात आज पाचव्या दिवशी चौथ्या बौद्धिक व्याख्यानात "बालविवाह प्रतिबंध " या विषयावर प्रा.डॉ.आशिया चिश्ती प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. यावेळी त्यांच्यासमवेत व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा.डॉ.मेघा जोशी , प्रा,कुंती राठोड, ,प्रा.गायकवाड, प्रा.कु.कारभारी, कु . बुलबुले हया उपस्थित होत्या..कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्रमुख उपस्थितांच्या हस्ते संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमास सुरुवात झाली. सकाळच्या पहिल्या सत्रात प्रमुख पाहुणे डॉ.अंकुश शेवाळकर आणि डॉ.अश्विनी गाढवे (आरोग्य उपकेंद्र, कदेर)यांच्या उपस्थितीत आणि डॉ.भीमाशंकर पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते.या तपासणी शिबिरात अनेक रुग्णांची आणि गावकऱ्यांची शुगर तपासणी, बी.पी., हिमोग्लोबीन तपासून औषध व गोळ्या वाटप करण्यात आले.त्यानंतर दुपारच्या सत्रात डॉ. आसिया चिश्ती यांनी आपल्या व्याख्यानास सुरुवात केली .खरंच आज घडीला बालविवाह अस्तित्वात आहे का इथपासून ते बालविवाह प्रथा कशी नष्ट करता येईल आणि एका संपन्न आणि प्रगतिशील समाजाची निर्मिती कशी घडवून आणता येईल याविषयीचे सखोल मार्गदर्शन केले.ग्रामीण भागात आजही लहान मुला,मुलींचे लग्न राजरोसपणे लावले जाते.आज आपण स्वतःला आधुनिक आणि प्रगतिशील समाज संबोधतो पण मराठवाड्यात आजही बालविवाहाचे प्रमाण प्रचंड आहे.आजही हिंगोली जिल्ह्यात बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात अस्तित्वात आहे.मध्ययुगीन कालखंडात अनेक अनिष्ट,रूढी आणि परंपरा प्रथा होत्या ,त्यातलीच ही बालविवाह प्रथा होय.खरे पाहिल्यास कोणत्याही वेदात याचा उल्लेख आढळत नाही ,मात्र धर्मशास्त्रात पराशर स्मृती व मनुस्मृतीसारख्या ग्रंथात याचा उल्लेख आढळतो.या ग्रंथात स्त्रियांवर अनेक जाचक व अमानवी बंधने घातली आहेत.तेंव्हापासून ते आजतागायत आपण ही अनिष्ट परंपरा पाळतो आहोत.याची कारणे आपल्याला शोधता आली पाहिजेत.एक तर अज्ञान आहेस पण त्याच बरोबर समाजामध्ये वाढती असुरक्षितता निर्माण झाली आहे .या वाढत्या असुरक्षिततेमुळे माणूस अस्थिर होतो .आपले पालक ,आई, वडील तणावग्रस्त होतात आणि या तणावग्रस्तातून एक जबाबदारी म्हणून मुला मुलींचे पंधरा वर्षातच लग्न लावले जाते. अशा या बालविवाहामुळे अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.तसे पाहिले तर बालविवाह अनैसर्गिक असून अ मानवी आहे ,त्यामुळे मुलीचे आरोग्य तर धोक्यात येतेच परंतु तिच्या शारीरिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागते. शरीराची संपूर्णतः वाढ ही होऊ न देता तिच्यावर जबरदस्तीने मातृत्व लादले जाते .यामुळे ती दबून जाते. खचून जाते .नाउमेद होते आणि त्यातून अनेक समस्या उद्भवतात.आजघडीला युवकासमोरील ,युवतीसमोरील ही आव्हाने आहेत.समाजात आजही अनेक बाबतीत अज्ञान आणि अंधश्रध्दा आहेत त्यातूनच अशा अनिष्ट रूढींना खतपाणी मिळत राहते.राजाराम मोहन रॉय,महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्यापासून ते महात्मा फुले,सावित्रीबाई फुले आणि शेवटी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या समग्र स्वतंत्र विचारांना व स्वावलंबी जीवनाला संविधानिक अधिष्ठान दिले आहे,याचा आपण साकल्याने विचार केला पाहिजे असे सांगून अत्यंत साधक बाधक पद्धतीने डॉ.आशिया चिश्ती यांनी विद्यार्थ्यांचे प्रबोधन केले.बालविवाह प्रतिबंध याविषयीचे आपले सांगोपांग विचार आणि इतर विचारप्रवाह उलगडून दाखवले. आजचा युवक युवती यांनी सकारात्मक विचार केला पाहिजे. निकोप समाजव्यवस्थेसाठी आपण वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगून योग्य ती जनजागृती केली पाहिजे. बालविवाह झाला की अकाली विधवा होण्याचे प्रमाण वाढते.मग मुलगी विधवा झाली की केशवपण आले आणि अशा महिलेकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन हा अत्यंत गलिच्छ स्वरूपाचा असतो त्यामुळे स्त्रियांनी किंवा मुलींनी आपले वर्तन हे शुद्ध ठेवले पाहिजे.चारित्र्य आणि शील सांभाळले पाहिजे शिक्षण हे सर्वांगीण सुधारण्याचे प्रवेशद्वार असले तरी आपण शिक्षण घेत असताना मुलींनी याचा सम्यक विचार आवर्जून केला पाहिजे. आपल्या नावासमोर आपल्या आई-वडिलांचे नाव जोडलेले असते याचे भान ठेवले पाहिजे.अन्यथा समाजाचा आपल्याकडे बघण्याचा दृष्टिकोन हा कालुशीतच राहणार आहे.त्यामुळे आपल्यालाही सर्वांगसुंदर जगता आले पाहिजे.हे सर्वांगसुंदर जगण्यासाठी आपल्या अंगी तेजस्विता,तपस्विता आणि तत्परता असायला हवी,चांगले वाईट यातील फरक कळायला हवा तर आणि तरच समाजपरिवर्तन घडू शकते, समाजबदल होऊ शकतो.डॉ.आशिया चिश्ती यांनी यांनी अत्यंत समर्पक उदाहरणे देत आपले व्याख्यान तेवत ठेवले."बालविवाह प्रतिबंध " या बौद्धिक व्याख्यानाचे अध्यक्ष प्रा. डॉ. मेघा जोशी यांनीही विद्यार्थ्यांनी ,बालविवाह प्रतिबंध या विषयावर बोलताना ,आपण सर्वांनी मिळून बालविवाह प्रथा संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

योजनेच्या उद्दिष्टांमध्ये अंधश्रद्धा निर्मूलन हा विषय कायम ठेवला जातो तसाच बालविवाह आणि त्यानुषंगाने निर्माण होणाऱ्या समस्या समजून सांगण्यासाठी हा विषयही अत्यंत महत्त्वाचा आहे.त्याचे कारण म्हणजे आजचा युवक हा अंधश्रद्धा मुक्त असला पाहिजे.विज्ञाननिष्ठ असला पाहिजे.असे सांगितले.

"बालविवाह प्रतिबंध" .या कार्यक्रमाचे नेतृत्व व सूत्रसंचालन शिबिरातील विद्यार्थिनी प्रतिनिधी कू. स्वाती घोडके हिने केले तर कार्यक्रमाचे आभार कु.महानंदा कटकधोंड हिने व्यक्त केले. या कार्यक्रमास गावातील बहुसंख्य गावकरी, महिला, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या 'पारखं झालं गाव' काव्यसंग्रहाचे कन्नड येथे प्रकाशन व रसग्रहण




**आ**ज कन्नड येथे तिफण कविता महोत्सव महोत्सवात कवी श्री नारायण सुमंत सर यांचे शुभ हस्ते प्रकाशित होणाऱ्या कवी ज्ञानेश्वर गायके यांच्या पारख झालं गाव या कवितासंग्रहाचे प्रकाशना निमित्त कवी सुरेश औटे यांनी केलेले रसग्रहण..कन्नड तालुक्याच्या मातीत उगवलेला " ज्ञानवृक्ष "म्हणजेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध कवी. "पेरणीकार" ज्ञानेश्वर गायके होय. "पेरणी," "पारखं झालं गाव," आणि "माझ्या गावाची वाट," हे त्यांचे तीनही कवितासंग्रह म्हणजे मराठी साहित्याला आणि वाचकांना मिळालेलं "शब्ददान" आहे असं म्हटलं, तर वावग ठरणार नाही., कवी. ज्ञानेश्वर गायके यांचा जन्मच मुळात कन्नड तालुक्यातील खामगाव सारख्या खेडेगावात, कष्टकरी कुटुंबात झाला असल्याने त्यांच्या कवितेतून ग्राम संस्कृतीचे यथार्थ चित्रण पहावयास मिळते. खेड्यात जन्मलो, खेळलो, वाढलो, आणि शिकलोही, असल्याने गाव संस्कृती, ग्रामीण भागातील प्रश्न, इथल्या वेदना, कवितेतून प्रगट होतात. कविता वाचता- वाचता वाचकां च्या डोळ्याच्या कडा कधी पाणवतात ,कळतच नाही. कवी ज्ञानेश्वर गायके हे मातृह्रदय आहेत. साहित्य प्रांतात त्यांना सर्वजण "माऊलीच" म्हणतात. त्यांची कविता म्हणजे आईची माया, आहे पित्याचे छत्र, तर जिव्हाळ्याचा मित्र, आहे खेडेगावात जन्मलेल्या पण पोटापाण्यासाठी गाव सोडून शहरात आलेल्या असंख्य नोकरदार कामगार व्यावसायिक उद्योगी इत्यादी विविध कारणे गाव सोडावं लागलेल्या लोकांच्या मनातील गाव सोडल्याची सल वेदना कवी ज्ञानेश्वर गायके यांचा हा पार्थ झालं गाव हा कवितासंग्रह होय .आपल्या पहिल्याच कवितेत ते म्हणतात की, पोटापाण्यासाठी मी सोडता झालो गाव आता मायबाप देवा घरी अन् पारखं झालं गावं....कामाच्या निमित्ताने उदरनिर्वाहासाठी गाव गावाकडची माणसं आणि जन्मभूमी माती सोडून शहर वस्तीला आलेल्या कवीचा जीव रमत नाही कारण इथे गावाकडल्या घरासारखं अंगण नाही हिरवी गार झाडे नाही सडा सारवण नाही इथे आहे सिमेंटची जंगलं घड्याळाच्या काट्यावर चालणारे जीवन रोजची धावपळ आणि सगळीकडे दाट सिमेंटची घर, यामुळे इथे काहीच कळत नाही. सिमेंटच्या जंगलात या कवितेत कवी म्हणतो इथं कोणताच ऋतू कळत नाही पावसाचे ढग दिसत नाही अन् जीव माझा रमत नाही.....शेती दुष्काळ धरणामुळे धरणात गेलेली शेती त्यामुळे निर्माण झालेली प्रश्न शिक्षण आणि नंतर नोकरीसाठीची वन वन वाट्याला आलेली बेकारी पण त्यातून आलेले जीवन अनुभव यांची भयानकता अनुभवताना जीवनात अनेक चढउतार आले प्रवासात अनेक चांगली वाईट माणसेही भेटली काही स्वार्थी काही लुटणारी फसवणारी साथ सोडून जाणारी या सर्वांपासून कवीला खूप काही शिकायला मिळाले पूर्वीसारखे माणसं राहिले नाही याचं कवीच्या मनाला दु:ख आहे माणसं बदलली कामापुरता प्रत्येकाचे पाय मात्र चाटतो आहेगरज सरो अन् वैद्य मरो हा नवा पायंडा पडतो आहे....कवी ज्ञानेश्वर गायके यांची कविता आईसाठी लिहिलेली कविता आहे तुझ्यासाठी आज। करितो मी काव्य। तुझे कर्मदिव्य। देवावाणी।पारखं झालं गावं या काव्यसंग्रहातून कवी ज्ञानेश्वर गायके यांनी सर्वच महत्वपूर्ण अशा विषयांना सहज हात घातला आहे सामाजिक भौतिक नैसर्गिक आणि आधुनिक त्याचबरोबर व्यवस्थेच्या सर्व प्रश्नांना वाचा फोडणारी कविता स्वार्थ आणि हव्यासापाई मानवाने निसर्गावर मात करण्याचा केलेला प्रयत्न आणि त्यामुळे ढासळलेला निसर्गाचा समतोल यामुळे मानवी जीवनावर झालेले दुर्गामी परिणाम तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान याचा अवास्तवअतिशोक्ती वापर ढासळलेली नितीमूल्ये या परिस्थितीला आपणच जबाबदार आहोत आणि या परिस्थितीतून नवा समाज घडविण्याची जबाबदारी ही आपलीच आहे हे कवी जाणतो आणि त्यासाठी लेखनी हाती घेऊन कवी लढायलाही शिकवितो आहे ही ज्ञानेश्वर गायके यांची कविता आहे त्याचबरोबर मातेचे संस्कार, पित्याचा आधार, आणि मित्रासारखी वाट दाखवणारी कविता त्यांनी लिहिली आहे पारखं झालं गावं हा कवितासंग्रह सर्वांचेच प्रतिनिधित्व करणारा असून समाज व्यवस्था समाजमन मांडताना कवी हा आशावादी आहे सकारात्मक साहित्य लेखनाचा आशय घेऊन कवी लिहिता झाला आहे .मराठी साहित्यिकांनी तसेच वाचकांनी आवर्जून वाचावा असा हा कवितासंग्रह असून मित्रवर्य ज्ञानेश्वर गायके यांच्या एकूणच संपूर्ण वाटचालीस खूप खूप शुभेच्छा...


**समीक्षक: सुरेश अशोक औटे**
**मो.9921243484,**
**sureshaute३२६@gmail.com**

**पुस्तक: पारखं झालं गावं**
**कवी. : ज्ञानेश्वर गायके,**
**प्रकाशक: लीला साहित्य पब्लिकेशन पुणे,**


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६

# शिल्पमोती : स्त्रीअनुभवांचे साहित्यशिल्प आणि सामाजिक वास्तव




**म**राठी कथासाहित्य ही केवळ कल्पनाविलासाची परंपरा नसून समाजाच्या अंतर्मनाचा शोध घेणारी, काळाच्या साक्षीने बदलणारी आणि माणसाच्या अनुभवविश्वाला शब्दरूप देणारी सर्जनशील प्रक्रिया आहे. या परंपरेत सुनिता दरे यांचा 'शिल्पमोती' हा प्रथम कथासंग्रह विशेष महत्त्वाचा ठरतो. या कथासंग्रहात एकूण बारा कथा अआहेत. हा संग्रह केवळ स्त्रीकेंद्री नाही, तर स्त्रीच्या अनुभवांतून माणूस, नातेसंबंध, निर्णय, नैतिकता आणि सामाजिक वास्तव यांचा खोल वेध घेणारा आहे. हा कथासंग्रह आशयघनतेच्या दृष्टीने अत्यंत समृद्ध आहे. श्रीमती जयश्री चव्हाण यांचा बल्र्ब या संग्रहाच्या सामाजिक व शैक्षणिक महत्त्वावर ठळक शिक्कामोर्तब करतो. त्या म्हणतात की, सर्व कथा स्त्रीकेंद्री आहेत; मात्र या स्त्रिया ना बंडखोर आहेत, ना व्यवस्थेविरोधात जाणाऱ्या—आणि तरीही त्या परिस्थितीला शरण जाणाऱ्या देखील नाहीत. दूरदृष्टीने विचार करून, शांतपणे आपला मार्ग स्वतः शोधणाऱ्या या स्त्रिया समाजाच्या विविध स्तरांतून उभ्या राहतात.

मराठी कथासाहित्याने नेहमीच समाजातील बदलते वास्तव, माणसाच्या अंतर्मनातील संघर्ष आणि नातेसंबंधांतील ताण यांचे प्रतिबिंब उमटवले आहे. सुनिता दरे यांचा शिल्पमोती हा कथासंग्रह या परंपरेत बसणारा, परंतु स्त्रीजीवनाच्या अनुभवांना केंद्रस्थानी ठेवून नव्या जाणिवेने लिहिलेला संग्रह आहे.

'शिल्पमोती' हे शीर्षकच या कथासंग्रहाचे अंतर्गत सूत्र स्पष्ट करते. मोती हा सहज सापडत नाही; तो वेदना, घर्षण आणि काळ यांच्या प्रक्रियेतून घडतो. याच अर्थाने या कथांतील स्त्रिया सहजतेने "महान" ठरत नाहीत, तर संघर्ष, त्याग, अपमान, मौन, निर्णय आणि आत्मभान यांच्या प्रक्रियेतून स्वतःला घडवतात. लेखिका स्त्रीला सहनशीलतेच्या मूर्तीत किंवा बळीच्या चौकटीत अडकवत नाही. ती स्त्रीला अनुभवांमधून घडणारी, विचार करणारी आणि बदल घडवणारी व्यक्ती म्हणून उभी करते. त्यामुळे या कथा करुणा निर्माण करतात, पण दया नाही; अस्वस्थ करतात, पण निराश करत नाहीत.

या कथासंग्रहातील 'स्त्री' आणि 'इच्छा' या कथा स्त्रीच्या आयुष्यातील मौनाचा इतिहास सांगतात. इथे स्त्रीचे दुःख ओरडत नाही; ते शांतपणे प्रश्न विचारते. 'इच्छा' या कथेत अल्झायमर हा आजार केवळ वैद्यकीय समस्या न राहता नात्यांमधील दुर्लक्षाचे, संवादाच्या अभावाचे आणि आयुष्यभर दडपून टाकलेल्या भावनांचे प्रतीक बनतो. स्त्री विसरते म्हणून ती हरवते की तिला विसरले जाते म्हणून ती हरवते ? हा प्रश्न या कथेतून समोर येतो. अल्झायमरने ग्रस्त स्त्रीपेक्षा तिच्या आयुष्याकडे दुर्लक्ष करणारी नाती अधिक अस्वस्थ करणारी ठरतात. इथे लेखिका भावनिक अतिरेक टाळून अत्यंत संयत पण खोल परिणाम करणारी मांडणी करते. 'निश्चय' ही कथा आधुनिक स्त्रीच्या निर्णयक्षमतेचे महत्त्व अधोरेखित करते. पारंपरिक सासू—सून संघर्षाच्या साच्यात न अडकता ही कथा आर्थिक नियोजन, जबाबदारी आणि भावनिक परिपक्वतेवर आधारलेली आहे. इथे 'आधुनिक' म्हणजे बेजबाबदार नव्हे, तर विचारपूर्वक निर्णय घेणारी व्यक्ती, हा संदेश ठामपणे व्यक्त होतो. विशेष म्हणजे या कथेत बदल केवळ सुनेत नाही, तर सासूच्या दृष्टिकोनातही घडतो. त्यामुळे ही कथा एकतर्फी भूमिका न घेता समतोल विचार मांडते.

याच निर्णयक्षमतेचा अधिक तीव्र आणि अस्वस्थ करणारा पैलू 'मार्ग' या कथेत दिसतो. सौंदर्य, पैसा, विवाह आणि स्त्रीचे सामाजिक मूल्य या सगळ्यांवर ही कथा थेट प्रहार करते. सीमा ही व्यक्तिरेखा कुठलीही आदर्श नायिका नाही; ती परिस्थिती ओळखून जगणारी, व्यवहार करणारी स्त्री आहे. "मी सुंदर नाही म्हणून पैशांच्या जोरावर तुला बांधून ठेवणार" हा संवाद धक्का देणारा असला, तरी तो खोटा नाही. ही कथा स्त्रीवादाची घोषणा करत नाही, पण स्त्रीच्या तगण्याच्या रणनीतीचे प्रामाणिक चित्रण करते. त्यामुळे वाचक अस्वस्थ होतो—आणि तेच या कथेचे यश आहे.

या कथासंग्रहाचा नैतिक शिखरबिंदू म्हणजे 'आभाळमन'. काळे मॅडम ही व्यक्तिरेखा मराठी कथासाहित्यात लक्षात राहणारी आहे. 'पत्नी' या नात्याचा अर्थ मालकी किंवा अंध सहनशीलता नसून न्याय, समतोल आणि जबाबदारी आहे, हे ती ठामपणे दाखवते. "मी तुमच्या पप्पांची बायको आहे" हे विधान केवळ संवाद न राहता संपूर्ण कथासंग्रहाचा नैतिक घोष ठरते. इथे स्त्री त्याग करत नाही; ती योग्य ते ठरवते. ही भूमिका घोषणात्मक स्त्रीवादापेक्षा अधिक परिणामकारक आणि परिपक्व आहे.

सामाजिक वास्तवाचा कडवा आणि अस्वस्थ करणारा स्पर्श 'ती भयाण रात्र' आणि 'प्रवासी' या कथांमधून मिळतो. 'ती भयाण रात्र' मध्ये दरोडा हा कथानकाचा केंद्रबिंदू नसून त्या घटनेनंतर माणसाच्या मनावर उमटणाऱ्या भीती, स्मृती आणि आघातांचा वेध घेतला आहे. दरोडेखोरांचा नारळ फोडण्याचा प्रसंग धर्म, श्रद्धा आणि गुन्हा यातील विसंगती उघडी पाडतो. लेखिका इथे सनसनाटी टाळून मानवी मनाच्या जखमेवर लक्ष केंद्रित करते. त्यामुळे ही कथा केवळ घटना सांगत नाही, तर त्या घटनेनंतर आयुष्यभर राहणाऱ्या मानसिक आघाताची जाणीव करून देते. 'प्रवासी' ही कथा माणसाच्या तात्पुरत्या अस्तित्वाची आणि आयुष्याच्या अनिश्चिततेची जाणीव करून देणारी आहे. प्रवास इथे भौगोलिक न राहता मानवी आयुष्याचा रूपकात्मक प्रवास ठरतो.

या संग्रहातील सर्वांत विस्तृत आणि वैचारिकदृष्ट्या समृद्ध कथा म्हणजे 'स्त्री'. हरिणाच्या हक्कावरून सुरू झालेला महाराज वीरसेन आणि मेघमाला यांचा वाद शेवटी संपूर्ण समाजाच्या स्त्रीविषयक मानसिकतेवर बाण सोडतो. गुरुमाता शारदा देवी हे या कथेचे वैचारिक मेरुदंड आहेत. "स्त्रिया भावनांनी निर्णय घेतात, म्हणून रणांगणासाठी अयोग्य आहेत" हे विधान आजही समाजाच्या अवचेतनात खोलवर रुजलेले आहे. शारदा देवी या विधानाला शब्दांनी नव्हे, तर प्रयोगातून उत्तर देतात—कन्यांसाठी स्वतंत्र आश्रम, शस्त्र-शास्त्राचे शिक्षण आणि प्रत्यक्ष परीक्षा. ही कथा सांगते की स्त्रीला संधी दिली तर ती याचिका करत नाही; ती इतिहास घडवते.

मेघमाला ही 'पुरुषासारखी' लढते म्हणून मोठी ठरत नाही, तर स्त्री म्हणूनच मोठी ठरते. तलवारबाजी, भाला, अश्वारोहण, श्लोकपूर्ती—प्रत्येक परीक्षेत ती समसमान उभी राहते. शेवटच्या ध्वनिभेदात ती चुकते, पण हा पराभव कमजोरीचा नाही; तो संवेदनशीलतेचा आहे. गुरुमाता शारदा देवींचे "ती हरली म्हणूनच तिने खूप काही जिंकलं" हे विधान या कथेचे वैचारिक शिखर ठरते. विवाहानंतरची मेघमाला ही खरी क्रांती आहे. "माझ्या दिवसाच्या पहिल्या दोन प्रहरांवर माझी मालकी हवी" ही मागणी प्रणयाची नव्हे, तर स्वातंत्र्याची घोषणा आहे. पुढे स्त्री सैन्याची उभारणी, युद्धनीती, शत्रूचा पराभव आणि तहाच्या अटी ठरवणारी महाराणी—ही कथा ठामपणे सांगते की स्त्री भावनिक असते, पण भावनाच तिची कमजोरी नसून ताकद असते.

सुनिता दरे यांची भाषा साधी, प्रवाही आणि परिणामकारक आहे. अलंकारांचा अतिरेक नाही, पण आशयाची धार तीव्र आहे. व्यक्तिरेखा कृत्रिम वाटत नाहीत, कारण त्या आपल्या आसपासच्या वास्तवातून आलेल्या आहेत. लेखिका कोणताही निष्कर्ष वाचकावर लादत नाही; ती प्रश्न सोडते—विचारासाठी, आत्मपरीक्षणासाठी.

शेवटी, शिल्पमोती हा कथासंग्रह स्त्रीकेंद्री असला तरी तो केवळ स्त्रीविषयक नाही. तो माणूस म्हणून आपण किती प्रामाणिक आहोत, नात्यांकडे कसे पाहतो, निर्णय घेताना नैतिकतेचा विचार करतो का—याचा आरसा आहे. हा संग्रह वाचकाला भावनिकदृष्ट्या हलवतोच, पण वैचारिकदृष्ट्याही समृद्ध करतो. म्हणूनच शिल्पमोती हा कथासंग्रह केवळ वाचून संपणारा नाही; तो वाचकाच्या मनात दीर्घकाळ घडत राहणारा साहित्यअनुभव आहे.

**पुस्तकांचे नाव---शिल्पमोती**
**लेखिका — सुनिता दरे**
**बल्र्ब -- श्रीमती जयश्री चव्हाण**
**लोकगाथा प्रकाशन**
**पृष्ठ** -80
**किंमत**- 100

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार १२ जानेवारी २०२६

# युवाशक्तीचे राष्ट्रनिर्माण आणि समाजपरिवर्तनातील स्थान

12 जानेवारी हा दिवस भारतात ‘राष्ट्रीय युवा दिन’ म्हणून साजरा केला जातो. हा दिवस केवळ स्वामी विवेकानंदांच्या जयंतीचा स्मरणोत्सव नसून तो भारतीय युवकांच्या आत्मभानाचा, सामाजिक जबाबदारीचा आणि राष्ट्रनिर्मितीच्या ध्येयाचा वैचारिक उत्सव आहे. विवेकानंदांनी युवकांना केवळ उद्याचे नागरिक म्हणून पाहिले नाही, तर आजच्या समाजाचे निर्णायक शिल्पकार म्हणून ओळखले. समाजशास्त्रीय दृष्टीने युवक हा कोणत्याही समाजातील सर्वाधिक गतिमान, सर्जनशील आणि परिवर्तनक्षम घटक असतो. सामाजिक रूढी, परंपरा, अन्याय आणि विषमता यांना प्रश्न विचारण्याची ताकद युवकांमध्येच असते. म्हणूनच राष्ट्रीय युवा दिन हा दिवस युवकांच्या ऊर्जेला योग्य दिशेने वळवण्याचा आणि समाजाला आत्मपरीक्षण करण्यास प्रवृत्त करणारा ठरतो. भारतीय समाजाची लोकसंख्यात्मक रचना पाहिली तर आपण युवकप्रधान राष्ट्र आहोत. देशातील मोठा हिस्सा 15 ते 35 वयोगटातील आहे. हे वास्तव भारतासाठी सुवर्णसंधी असली तरी त्याचबरोबर मोठे सामाजिक आव्हानही आहे. योग्य शिक्षण, कौशल्य, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्यास ही युवकसंख्या राष्ट्राच्या आर्थिक, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा कणा ठरू शकते. परंतु समाजशास्त्र सांगते की संधींचे असमान वितरण, वर्गभेद, जातीय विषमता, ग्रामीण—शहरी दरी आणि लिंगाधारित भेदभाव युवकांच्या क्षमतेला मर्यादा घालतात. आजही मोठ्या प्रमाणावर युवक बेरोजगारी, अल्परोजगार आणि अस्थिर कामाच्या विळख्यात अडकलेले आहेत. शिक्षण असूनही सन्मानजनक रोजगार न मिळाल्याने युवकांमध्ये निराशा, असंतोष आणि सामाजिक तणाव वाढत आहे. हा असंतोष वैयक्तिक अपयशाचा नव्हे, तर सामाजिक-आर्थिक रचनेतील अपुरेपणाचा परिणाम आहे. स्वामी विवेकानंदांनी युवकांना आत्मविश्वास, स्वाभिमान आणि ध्येयवादाचा संदेश दिला. “उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका” हा त्यांचा मंत्र आजच्या अस्थिर आणि स्पर्धात्मक जगात अधिकच अर्थपूर्ण ठरतो. डिजिटल माध्यमांच्या युगात युवक सतत तुलना, प्रसिद्धी आणि बाह्य यशाच्या दबावाखाली जगत आहेत. सोशल मीडियावर निर्माण होणाऱ्या आभासी प्रतिमा अनेकांना न्यूनगंड, एकाकीपणा आणि नैराश्याकडे ढकलतात. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे ‘ओळखीचे संकट’ आहे, जिथे व्यक्ती स्वतःचे मूल्य समाजाने ठरवलेल्या निकषांवर मोजते. विवेकानंदांचा आत्मसन्मानाचा विचार युवकांना अंतर्गत सामर्थ्यावर उभे राहण्याची प्रेरणा देतो, जी सामाजिक सशक्तीकरणासाठी अत्यावश्यक आहे. शिक्षण हा युवकांच्या सामाजिक उन्नतीचा कणा आहे. परंतु आजचे शिक्षण बहुतेक वेळा केवळ बाजारपेठेच्या गरजांपुरते मर्यादित राहिले आहे. पदवी, गुण आणि प्रमाणपत्रे मिळतात, पण सामाजिक भान, नैतिकता आणि नागरिकत्वाची जाणीव दुर्लक्षित राहते. विवेकानंदांनी शिक्षणाला ‘चरित्रनिर्मिती’ असे संबोधले होते. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर शिक्षित पण सामाजिकदृष्ट्या असंवेदनशील युवक समाजासाठी घातक ठरू शकतो. शिक्षणाने युवकांना केवळ रोजगारासाठी नव्हे, तर जबाबदार नागरिक म्हणून घडवले पाहिजे, जे अन्याय, भेदभाव आणि शोषणाविरुद्ध उभे राहतील. शिक्षणातून वैज्ञानिक दृष्टिकोन, लोकशाही मूल्ये आणि सामाजिक न्यायाची जाणीव निर्माण होणे आवश्यक आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण आणि तंत्रज्ञानामुळे युवकांच्या आयुष्यात मोठे बदल घडले आहेत. एकीकडे नव्या संधी, माहिती आणि जागतिक संपर्क उपलब्ध झाले आहेत, तर दुसरीकडे अस्थिर रोजगार, स्थलांतर, कौटुंबिक ताण आणि मानसिक असुरक्षितता वाढली आहे. ग्रामीण युवक शेतीतील अनिश्चित उत्पन्न आणि नैसर्गिक आपत्तींच्या धोक्यामुळे शहरांकडे स्थलांतर करतात, परंतु शहरांमध्येही त्यांना सन्मानजनक जीवन, सुरक्षित काम आणि सामाजिक आधार हमखास मिळेलच असे नाही. समाजशास्त्र सांगते की जेव्हा युवकांच्या अपेक्षा आणि वास्तव यातील दरी वाढते, तेव्हा सामाजिक तणाव, आंदोलन आणि अस्थिरता निर्माण होते. त्यामुळे युवकांच्या समस्यांकडे वैयक्तिक नव्हे, तर संरचनात्मक दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. लोकशाहीमध्ये युवकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. युवक हे मतदार, कार्यकर्ते, स्वयंसेवक आणि विचारवंत म्हणून लोकशाहीला ऊर्जा देतात. परंतु आज अनेक युवक राजकारणापासून दूर राहतात, कारण त्यांना राजकीय व्यवस्था भ्रष्ट, गुंतागुंतीची आणि सामान्य माणसापासून दूर वाटते. विवेकानंदांनी मात्र सामाजिक आणि राष्ट्रीय प्रश्नांवर सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते राष्ट्र म्हणजे केवळ भौगोलिक रचना नसून लोकांचे जिवंत संघटन आहे. युवक जेव्हा सामाजिक अन्याय, भ्रष्टाचार, पर्यावरणीय संकटे आणि मानवी हक्कांच्या उल्लंघनाविरुद्ध आवाज उठवतात, तेव्हाच लोकशाही सशक्त होते आणि राज्यसत्ता अधिक उत्तरदायी बनते. स्त्री-पुरुष समानता, जातीय समता आणि सामाजिक न्याय या मूल्यांशिवाय युवकांचे सशक्तीकरण अपूर्ण आहे. आजही अनेक तरुणी शिक्षण, रोजगार आणि सार्वजनिक आयुष्यात भेदभावाचा सामना करतात. बालविवाह, लैंगिक हिंसा, कामाच्या ठिकाणी असमानता आणि प्रतिनिधित्वाचा अभाव या समस्या युवकवयातच त्यांच्या प्रगतीला मर्यादा घालतात. विवेकानंदांनी स्त्रीला राष्ट्राची शक्ती मानले. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर जे समाज आपल्या स्त्रियांना संधी देतात, तेच समाज प्रगत होतात. युवकांनी लिंगभाव, जात आणि वर्गाच्या पलीकडे जाऊन समतेचा स्वीकार करणे हीच खरी सामाजिक क्रांती आहे. जातव्यवस्था, आदिवासी व दलितांचे प्रश्न, अल्पसंख्याकांचे हक्क आणि प्रादेशिक असमतोल या भारतीय समाजातील दीर्घकालीन समस्या आहेत. युवक जर या प्रश्नांकडे उदासीन राहिले, तर अन्याय टिकून राहतो. परंतु युवक जागरूक झाले, तर सामाजिक बदल शक्य होतो. विवेकानंदांनी मानवतेवर आधारित राष्ट्रवादाचा पुरस्कार केला, जो सर्वांना समान संधी आणि सन्मान देणारा आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून युवकांनी बहुसांस्कृतिकता, सहअस्तित्व आणि सामाजिक सलोखा यांची कास धरली पाहिजे. तंत्रज्ञान आणि माध्यमांनी युवकांच्या विचारविश्वाला नवे आयाम दिले आहेत. माहितीच्या महासागरात वावरताना सत्य आणि असत्य, ज्ञान आणि प्रचार यातील फरक ओळखणे अत्यंत महत्त्वाचे झाले आहे. विवेकानंदांनी विवेकबुद्धी आणि चिंतनशीलतेवर भर दिला. आजच्या युवकांनीही तंत्रज्ञानाचा उपयोग शिक्षण, संशोधन, समाजसेवा आणि लोकशाही सशक्त करण्यासाठी करणे गरजेचे आहे, अन्यथा तेच तंत्रज्ञान द्वेष, अफवा आणि विभाजन पसरवण्याचे साधन ठरू शकते.

पर्यावरणीय संकट, हवामान बदल, जलसंकट आणि जैवविविधतेचा ऱ्हास हे आजच्या युवकांसमोर उभे असलेले मोठे आव्हान आहे. भविष्यातील पिढ्यांचे हक्क जपण्यासाठी युवकांनी शाश्वत विकासाची भूमिका स्वीकारणे आवश्यक आहे. विवेकानंदांनी निसर्गाशी सुसंवाद साधण्याचा विचार मांडला होता. समाजशास्त्रीयदृष्ट्या पाहिले तर पर्यावरणीय न्याय आणि सामाजिक न्याय हे एकमेकांशी जोडलेले आहेत. गरीब आणि वंचित समुदायांवर पर्यावरणीय ऱ्हासाचा सर्वाधिक परिणाम होतो, त्यामुळे युवकांनी या प्रश्नांवर संवेदनशील असणे गरजेचे आहे. राष्ट्रीय युवा दिन हा केवळ उत्सवाचा नव्हे, तर आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण आपल्या युवकांना केवळ स्पर्धात्मक यशासाठी घडवत आहोत की त्यांना संवेदनशील, जबाबदार आणि सामाजिकदृष्ट्या जागरूक नागरिक बनवत आहोत, हा प्रश्न विचारण्याची ही वेळ आहे. विवेकानंदांचे स्वप्न असे युवक घडवण्याचे होते जे स्वतःसाठीच नव्हे, तर समाजासाठी जगतील. आजच्या भारताला अशाच युवकांची गरज आहे जे विज्ञान, तंत्रज्ञान आणि आधुनिकतेसोबत करुणा, समता आणि मानवतावाद यांची सांगड घालतील. अखेर, युवक हीच राष्ट्राची खरी संपत्ती आहे. त्यांची ऊर्जा, सर्जनशीलता आणि परिवर्तनाची आस हीच समाजाला पुढे नेते. राष्ट्रीय युवा दिनानिमित्त आपण स्वामी विवेकानंदांच्या विचारांकडे केवळ गौरवाने पाहू नये, तर ते आपल्या शिक्षणात, कामात आणि सामाजिक जीवनात उतरवावेत. कारण जेव्हा युवक स्वतःला बदलतो, तेव्हाच समाज बदलतो; आणि जेव्हा समाज बदलतो, तेव्हाच भारत देश खऱ्या अर्थाने समताधिष्ठित, सशक्त आणि प्रगत राष्ट्र म्हणून उभा राहू शकतो.



***डॉ. राजेंद्र बगाटे**
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)*,
bagate.rajendra५@gmail.com

## नाळ

गीतं जात्यावर गाता
थरथर हाता आली
लेक नातीची आठवण
गाली आसवे ओघळली..

ढग दाटती आभाळी
तशा उफाळल्या आठवणी
जड झालं जीवा तरी
लेक नातीची पाठवणी..

उद्या येईल दिवाळी
रुणझुण पावलांनी
लेक नातीचं ग येणं
गेले अंतरी भारावूनी ..

बांधी घरादाराला तोरणं
सजे आकाशी कंदील
आली नातुली लाडुली
पडे सोनियाच पाऊल..

विनविते बा विठ्ठला
दुःखाचा रे नको संग
जात्यावरी गाते ओवी
मुखे आळविते रे अभंग..

**कवयित्री मनिषा खोबरे येडशी**

## राजमाता जिजाऊ

शूर मर्दानी विदर्भ कन्या
सकलांची माता जिजाऊ
इतिहासाची पाने त्यांची
गोडवे लागतात गाऊ

धैर्यशील व न्यायप्रिय
अशी शूरवीर राजमाता
स्वराज्यात अखंड नांदे
न्याय आणि समता

घोडेस्वार व तलवारबाजीत
होत्या त्या अती निपून
सुखाचा त्याग करूनी
जोवाचे केले रान

बलाढ्य ती रणरागिणी
शिवबा तिचा छावा
हाती तलवार घेवूनी
हाणून पाडला दुश्मनाचा कावा

स्वराज्याचे बाळकडू पाजूनी
शिवबा तिने घडविला
नमन करूया आपण
राजमाता जिजाऊला



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६